महाराष्ट्र शासन

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

टेलिफोन नं-०२३१-२६४१५८३
ईमेल- storercsmgmck@gmail.com

फॅक्स नं.०२३१-२६४४३६९
वेबसाईट - www.rcsmgmc.ac.in

जा.क्र/राछशामशावैमवछप्रासरुको/आस्था ४/ ८७५१ /२०२५ दिनांकः- १० /१०/२०२५

## प्रसिध्दीपत्रक

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर या संस्थांमधील गट – ड (वर्ग -४) संवर्गातील सरळसेवा भरती – निवड झालेल्या व प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व उमेदवारांच्या कागदपत्रांची फेरपडताळणी करणेबाबत...**

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई अधिनस्थ आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई अंतर्गत अधिष्ठाता,राजर्षी छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय यांच्या आस्थापनेवरील गट-ड (वर्ग-४) संवर्गातील विविध रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता दिनांक १९ मे, २०२५ रोजी महाराष्ट्रातील विविध परिक्षा केंद्रांवर एकूण ०२ सत्रांमध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये निवड झालेल्या व प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी दिनांक २१/०८/२०२५ रोजी करण्यात आलेली आहे. सदर कागदपत्रे पडताळणीकरिता अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरिता एक संधी देऊन त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी दिनांक ०९/०९/२०२५ रोजी करण्यात आलेली आहे.

तथापि, काही प्रशासकीय कारणास्तव दिनांक १६/१०/२०२५ रोजी कागदपत्रांची फेरपडताळणी करण्यात येत असून निवड यादीमध्ये समाविष्ट असलेल्या तसेच प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व उमेदवारांनी दिनांक १६/१०/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर, शेंडा पार्क, आर.के.नगर रोड, कोल्हापुर पिन.४१६०१२ याठिकाणी आपल्या सर्व मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहावयाचे आहे. कागदपत्रे फेरपडताळणी करिता उपस्थित राहताना सर्व मूळ कागदपत्रे तसेच मूळ कागदपत्रांच्या दोन स्वसाक्षांकित सत्यप्रती घेऊन यावयाच्या आहेत. कागदपत्रांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे.

**दिनांक १६/१०/२०२५ रोजी विहीत वेळेत जे उमेदवार कागदपत्रे फेरपडताळणीकरिता उपस्थित राहणार नाहीत, ते सदर पदी काम करण्यास इच्छूक नाहीत, असे समजून त्यांचे नाव निवड यादी तसेच प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच ज्या उमेदवारांनी दिनांक २१/०८/२०२५ रोजी अथवा दिनांक ०९/०९/२०२५ रोजी कागदपत्रे पडताळणी केलेली असली तरी सदर उमेदवारांनी पुन्हा दिनांक १६/१०/२०२५ रोजी त्यांच्या कागदपत्रांची फेरपडताळणी करणे बंधनकारक आहे.** सदरचे प्रसिध्दीपत्रक www.rcsmgmc.ac.in व kolhapur.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवरुन प्रसिध्द करण्यात आलेले आहे, तरी सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

डॉ.अजित लोकरे,
अधिष्ठाता,
रा.छ.शा.म शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,
कोल्हापुर तथा सदस्य, जिल्हा निवड समिती,

अमोल येडगे, (भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, कोल्हापुर तथा
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,
गट ड (वर्ग ४) सरळसेवा भरती